महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१९

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुस, ताडाही, बल्लारपूर व चंद्रपूर या चार समुहविकासमधील उद्योगबंदी उठविल्याबाबत

(१) ६३६४२ (२४-०८-२०१६) श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुस, ताडाही, बल्लारपूर व चंद्रपूर या चार समुहविकासमधील उद्योगबंदी केंद्रीय वन व पर्यावरणमंत्री महोदयांनी उठविल्याचे माहे मे, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा इको सेन्सेटीव्ह झोन जाहिर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, नविन उद्योगांकडून प्रदुषणनिर्माण होणार नाही यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे, नविन उद्योगांकडून स्थानिक नागरिक तसेच बंद पडलेल्या उद्योगांमधून बेरोजगार झालेल्या कामगारांना रोजगारात प्रथम प्राधान्य देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे ?

श्री. रामदास कदम (२२-०२-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) होय, ताडोबा- अंधारी व्याघ्र प्रकल्प इको सेन्सेटीव्ह झोन म्हणून जाहीर करण्यात आला आहे.

(३) उद्योग बंदी उठविल्यावर नविन उद्योग उभारणी झाली नाही.

नाशिक येथील गरीब नवाज स्क्रॅप एन्टरप्राईजेस कंपनीचे प्रमाणपत्र खोटे असल्याबाबत

(२) ७४२५० (२१-०४-२०१७) श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गरीब नवाज स्क्रॅप एन्टरपाईजेस, संजीवनगर, अंबड लिंक रोड, नाशिक यांना जा.क्र.एमपीसीबी/आरओएनके/सीओएन/१६९/२०१३, अन्वये दिनांक ७ ऑक्टोबर, २०१३ रोजी देण्यात आलेले प्रमाणपत्र हे खोटे असल्याची बाब उपप्रादेशिक अधिकारी, नाशिक यांच्या दिनांक ०२ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या पत्रान्वये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारचे खोटे प्रमाणपत्र देऊन शासनास प्राप्त होणारा महसुल बुडविल्याची शासनास माहिती आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती संबधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (०३-०८-२०१७) : (१) होय, खरे आहे.

(२), (३) व (४) यानुषंगाने उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांनी मे. गरीब नवाज स्क्रॅप एंटरप्रायझेस यांच्याविरुध्द त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे बनावट संमतीपत्र तयार केले म्हणून अंबड पोलीस स्टेशन, नाशिक येथे दिनांक ३०/०१/२०१९ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वायु प्रदूषण रोखण्यासाठी करावयाची कार्यवाही

(३) ७४८६८ (०६-०५-२०१७) श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाहने, उद्योगधंद्यामुळे वायु प्रदूषणाची पातळी दिवसेंदिवस वाढत असून हवेच्या ढासळत्या दर्जाबाबत चिंता व्यक्त होत असल्याने हवेची गुणवत्ता तपासणाऱ्या सफर या संस्थेकडून जाहीर झालेल्या आकडेवारीवरून दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील प्रदूषण दूर करण्याकरीता इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) आणि नॅशनल इन्व्हार्यमेंटल इंजिनीअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट (निरी) यांनी तयार केलेले विंड ऑर्ग्यूमेंटेशन प्युरिफाइंग युनिट (वायू) हे यंत्र महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सहकार्याने कलानगर येथील मोठ्या सिग्नलवर तसेच ठिकठिकाणी बसविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग २ बाबत या फेब्रुवारीपर्यंत सदरील यंत्रांच्या परिणामकारकतेचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास त्यांचे स्वरुप काय आहे व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा कहरण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२१-०२-२०१९) : (१) होय हे अंशत: खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) व (४) सदर अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाला आहे. विंड ओग्मॅटेशन आणि प्युरीफायींग युनिट (WAYU) हे संयंत्रण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नीरी व भारतीय प्रौद्योगिक सस्था (IIT) मुंबई हयांच्या संयुक्त विद्यमाने विकसित केले आहे. सदर संयत्र हे वाहतूक कोंडीमुळे होणाऱ्या हवा प्रदूषणास कमी करण्याच्या उद्देशाने बनवले असून, हे संयंत्र १) हवेचा वेग वाढवून त्यातील प्रदूषित घटकाची तीव्रता कमी करणे. २) सक्रिय प्रदुषके काढून टाकणे. इ. हया यंत्रात कमी वेगाची हवा निर्माण करणारा पंखा, सम आकाराचे फिल्टर ज्यांचा वापर दीर्घकाळ व पुनर्वीचार करण्यात येऊ शकतो.तसेच त्याव्दारे कार्बन ऑक्साइड, हायड्रोकार्बन, व्होलाटाईल केंद्रीय संयुगे (VOC) हयांचे औ्ष्णिक ज्वलन करण्यात येते. त्याव्दारे हवा गाळली जाऊन त्यातील धुलीकरण दुर होतात व त्याचे औष्णिकीकरण (Thermal Oxidation) होते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर शहरातील अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यालया मधून जप्त केलेला गुटखा व पान मसाला चोरीस गेल्याबाबत

(४) ७५७६७ (२०-०४-२०१७) श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यालयामधून दिनांक २४ जुलै २०१६ रोजी सुमारे ९ ते १० लाख रुपयांचा जप्त केलेला गुटखा व पान मसाला चोरीस गेल्या प्रकरणी व झालेल्या चोरीचे चित्रीकरण सीसीटीव्ही मध्ये उपलब्ध असूनही तसेच दिनांक १२ जुलै रोजी एफडीएच्या विविध कार्यालयांमध्ये जप्त केलेल्या मालाची रितसर चोरी होत असल्याचे दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच एफडीएच्या सहाय्यक आयुक्तांविरोधात औषध कंपनीकडून लाखो रुपये हप्ता मागितल्याचा आरोप एका राजकीय कार्यकर्त्याने लेखी स्वरुपात करुनही, हे तक्रारपत्र दक्षता विभागाच्या तपासणीपर्यंत न जाता आवक लिपिकाकडेच पडून रहाणे व त्याच सहाय्यक आयुक्तांना दिनांक १४ सप्टेंबर २०१६ रोजी रुपये ४००००/- ची लाच घेताना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने अटक करणे या प्रकरणी संबंधीत आवक लिपिका विरुध्द तक्रारपत्र दडवून ठेवल्याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सोलापूर शहरातील अन्न व औषध प्रशासनाच्या विविध कार्यालयांमध्ये जप्त केलेल्या मालाचे रजिस्टर व पंचनामे वेळीच करण्यात येऊन त्याचा अहवाल आयुक्तांना त्याच दिवशी सादर न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच जप्त केलेल्या माला संबंधीचे पत्र आयुक्तांना सादर करण्यास हेतूत: होत असलेला चार ते पाच दिवसांचा विलंब यामुळे जप्त मालाची विल्हेवाट त्याआधीच करण्यात येत असल्याप्रकरणी अद्यापी कोणावरही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश बापट (०७-०२-२०१९) : (१) सोलापूर शहरातील अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यालयामधून दि.२४ जूलै, २०१६ रोजी सुमारे ०९ लाख रुपयांचा जप्त केलेला गुटखा चोरीस गेला हे खरे आहे. तथापि, एफडीएच्या विविध कार्यालयांमध्ये जप्त केलेल्या मालाची रितसर चोरी होत असल्याचे निदर्शनास येणे हे खरे नाही.
(२) सहायक आयुक्तांना लाच घेताना लाचलूचपत विभागाने अटक केली हे खरे आहे.
सहायक आयुक्तांबाबतचे तक्रार पत्र आवक लिपीकाकडे पडून राहीले नसून पत्र तात्काळ वरीष्ठाच्या निदर्शनास आणले असल्याने सदर लिपिका विरुध्द तक्रार दडवून ठेवल्याप्रकरणी कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) सोलापूर जिल्हातील अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी यांचे मार्फत वेळोवेळी गुटखा व तत्सम अन्न पदार्थ पंचासक्षम घटनास्थळी पंचनामा करुन जप्त करण्यात येतात व त्याची नोंद जप्त मुद्देमाल नोंदवहित घेतात तसेच कारवाईचा अहवाल तातडीने पदावधीत अधिकारी आणि आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना कळविण्यात येतो.
(४) दि.२५/०७/२०१६ रोजी गुटखा चोरी झाल्याची घटना कळल्यानंतर प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी सोलापूर पोलिस स्टेशन येथे दि.२६/०७/२०१६ प्रथम खबर अहवाल नोंदविला असून त्याचा गुन्हा क्रमांक ३६०/२०१६ असा आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात पिसाळलेला कुत्रा किंवा वन्यप्राणी चावल्यास उपचारासाठी आवश्यक असलेल्या औषधांची निर्मिती करण्याबाबत

(५) ७८३६३ (२०-०४-२०१७) श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पिसाळलेला कुत्रा किंवा वन्यप्राणी चावल्यास उपचारासाठी आवश्यक असलेल्या "ॲटी रेबीज सिरम" या औषधाची निर्मिती करण्यास "सेव्ह द ॲनिमल" या संघटनेने विरोध केल्यामुळे राज्यातील काही कंपन्यांनी सदर औषधाचे उत्पादन बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर येथील दोन्ही शासकीय रुग्णालयात ''अँटी रेबीज सिरम'' या औषधांचा माहे ऑगस्ट, २०१६ पासून साठा नसल्याचे व अमरावती विभागातही उक्त औषध अल्पप्रमाणात उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात सदर औषधांची टंचाई होवू नये म्हणून दुस-या पर्यायी औषधांची निर्मिती करण्याबाबत व नागपूर तसेच अमरावती येथे उक्त औषधाचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (०७-०२-२०१९) : (१) अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्हयातील रहिमतपूर महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्याचे निलंबन केल्याबाबत

(६) ८३१४९ (२८-०४-२९१७) श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हयातील रहिमतपूर महावितरण कंपनीत कार्यरत असलेले योगेश भंडारे या कर्मचा-याकडून कसलाही आर्थिक तोटा झालेला नसताना उपकार्यकारी अभियंता यांनी वैयक्तिक आकसापोटी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही कारवाई त्वरीत मागे घ्यावी अन्यथा कामगार कामबंद आंदोलन करतील अशा आशयाचे निवेदन येथील कामगार व अधिकारी संयुक्त कृती समितीच्यावतीने उपकार्यकारी अभियंता महावितरण यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यांसदर्भात कामगारांच्या असंतोषाची दखल घेवून शासनाने चौकशी करुन सदर कर्मचा-यांचे निलंबन त्वरीत मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०२-२०१९) : (१) श्री.योगेश भंडारे, तंत्रज्ञ यांनी नियमबाह्य कृती केल्यामुळे महावितरण कंपनीने दि.२९.१२.२०१६ च्या आदेशान्वये त्यांना निलंबीत केले होते.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) या प्रकरणी महावितरण कंपनीने श्री.भंडारे यांच्याविरुध्द विभागीय चौकशी पूर्ण केली व त्यांना सक्त ताकीद देऊन त्यांची पुनर्पस्थापना केली आहे.

चंद्रपुर जिल्हयात प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सुचनांची उद्योगांकडुन अंमलबजावणी होत नसल्याबाबत.

(७) ८४६९८ (०६-०५-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपुर जिल्हयात केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने नविन उद्योगांवरील बंदी उठविताना प्रदुषण नियंत्रक मंडळाला मार्गदर्शक सूचनांचे अधिनस्त बंदी उठविण्याची परवानगी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंदी उठल्यावर प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून सदर मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्यात जिल्हयातील उद्योगांना कोणतीही सुचना देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे चंद्रपुर जिल्हयातील प्रदुषणात पुन्हा वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने जिल्हयातील प्रदुषण नियंत्रित ठेवण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली व सदर नियमांचा भंग करणाऱ्या उद्योग व वाहनांवर कोणती कारवाई केली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२१-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.

केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय यांनी चंद्रपूर जिल्हयात मार्गदर्शक सूचनांच्या अधिनस्त नविन उद्योगांवरील बंदी उठविलेली आहे.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सदर मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्यात येते व उद्योगांना आवश्यकत्या सुचना/निर्देश देण्यात आलेल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) मंडळाकडून उद्योगांना भेटी देऊन भेटी दरम्यान दोषी आढळलेल्या उद्योगांवर वेळोवेळी कार्यवाही केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मालवण (जि. सिंधुदुर्ग) क्षेत्र पर्यावरणदृष्ट्या अतिसंवेदनशील क्षेत्र वर्गवारीतून सीआर झेड- २ वर्गवारीत समाविष्ट करण्याबाबत

(८) ८४८१२ (२१-०८-२०१७) श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि. सिंधुदुर्ग) क्षेत्र पर्यावरण दृष्ट्या अतिसंवेदनशील क्षेत्र वर्गवारीतून सीआर झेड-२ वर्गवारीत समाविष्ट करण्याबाबत केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालय, भारत सरकार यांजकडे महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधीकरणाकडून शिफारस करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालय, भारत सरकार यांजकडून राज्य शासनास अभिप्राय प्राप्त झाले आहेत काय,
(३) असल्यास, सदर अभिप्रायात काय नमूद केले आहे
(४) असल्यास, उक्त प्रकरणी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे आजतागायत केलेल्या पाठपुराव्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे?

श्री. रामदास कदम (१६-०२-२०१९) : (१) होय. हे खरे आहे.
(२) केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल, नवी दिल्ली यांनी दि. १६.०८.२०१८ रोजी मंजुर केलेले सिंधुदुर्ग जिल्हयाचे सि. आर. झेड. नकाशे प्राप्त झालेले आहेत. सदर नकाशे महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाच्या https://mczma.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
(३) मंजुर सि आर. झेड नकाशा मध्ये सिंधुदुर्ग जिल्हयाचे पर्यावरण दृष्ट्या अतिसंवेदनशील क्षेत्र,सि.आर.झेड,१,२ व ३ चे क्षेत्र दर्शिविलेले आहेत.
(४) पर्यावरण दृष्टया अतिसंवेदनशील क्षेत्र (सी.व्ही.सी.ए) बाबत महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दि. ९.१०.२०१२ व दि.३०.८.२०१३ रोजी झालेल्या ७७ व ८४ या बैठकीत केंद्रिय पर्यावरण वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना एकात्मिक व्यवस्थापन आराखडे (आयएमपी) तयार करण्यासाठी मार्गदर्शक सुचना देण्याबाबत दि. २६.३.२०१३ व १५.७.२०१४ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे. तसेच दि २०.३.२०१५ रोजी केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना स्मरण पत्रही निर्गमित करण्यात आले आहे. केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडे सिआरझेड अधिसुचना, २०११ च्या अंमलबजावणी बाबत दिनांक २९.९.२०१४ रोजीच्या बैठकिमध्ये पर्यावरण दृष्टया अतिसंवेदनशिल क्षेत्राचे (सी.व्ही.सी.ए) रेखांकन करण्याबाबत चर्चा करण्यात आली. सदर बैठकित राष्ट्रीय शाश्वत सागर तटीय व्यवस्थापन केंद्र (NCSCM), चेन्नई यांना सी.व्ही.सी.ए क्षेत्राचे आरेखन व रेखांकन करण्याबाबत निर्देश दिले आहेत. पर्यावरण विभागामार्फत दि.४.७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना मालवण क्षेत्र हे पर्यावरण दृष्टया अतिसंवेदनशील क्षेत्र (सी.व्ही.सी.ए.) वर्गवारी मधुन सिआरझेड -२ वर्गवारीत समाविष्ट करण्याबाबतही शिफारस करण्यात आली आहे. सदर प्रकरण महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दि.७.११.२०१५ रोजी झालेल्या १०७ व्या व्या बैठकीतही चर्चेसाठी ठेवण्यात आला होता.सदर बैठकीत झालेल्या निर्णया नुसार दिनांक २७.१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय शाश्वत सागर तटीय व्यवस्थापन केंद्र, (NCSCM) चेन्नई व केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना मालवण नगरपरिषदेचे क्षेत्र वगळून पर्यावरण दृष्टया अतिसंवेदनशील क्षेत्र (सी.व्ही.सी.ए) अंतिम करण्यासाठी विनंती करण्यात आली आहे. तदनुसार राष्ट्रीय शाश्वत सागर तटीय व्यवस्थापन केंद्र, (NCSCM) चेन्नई यांनी सी. आर झेड क्षेत्राचे व सी.व्ही.सी.ए.क्षेत्राचे आरेखन व रेखांकन केले.

कोल्हापूर येथे जिल्हा पर्यावरण समिती गठीत करण्याबाबत

(९) ८६०६१ (२१-०८-२०१७) श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झाला असून जिल्हा पर्यावरण समिती अद्यापही गठीत करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच गत अडीच वर्षामध्ये पर्यावरण समितीची एकही बैठक जिल्हाधिका-यांनी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पर्यावरण समिती गठित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (१५-०२-२०१९) : (१), (२) व (३) कोल्हापूर जिल्हयामध्ये जिल्हा पर्यावरण समितीची स्थापना दिनांक ६.५.२०१७ रोजी करण्यात आली असून सदर समितीच्या बैठका दिनांक १.७.२०१७ व दिनांक ०६.०२.२०१८ रोजी घेण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे गोऱ्हे (ता.वाडा,जि.ठाणे) कलीस्मा स्टील कंपनीने सोडलेले दूषित पाणी प्याल्याने म्हशींचा झालेला मृत्यू

(१०) ८७६२३ (२१-०८-२०१७) श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गोऱ्हे (ता.वाडा,जि.ठाणे) येथील कलीस्मा स्टील कंपनीने प्रदूषित पाणी नाल्यात सोडल्याने सदर पाणी पिऊन चार म्हशींचा मृत्यु झाल्याची घटना माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, सदर घटनेत मृत झालेल्या म्हशींच्या मालकांना कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२१-०२-२०१९) : (१) प्रश्नाधीन विषयाबाबतची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेली नाही. तथापि, पशुधन विकास अधिकारी, गो-हा, ता. वाडा, जिल्हा पालघर यांच्या अहवालानुसार गो-हे ता. वाडा गावातील काही शेतक-यांच्या म्हशी व शेळया आजारी असल्याने मृत पावल्याची घटना सदर गावामध्ये घडल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) मे. कलिस्मा स्टील प्रा.लि. गो-हे ता. वाडा जिल्हा पालघर या कारखान्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ४.९.२०१७ रोजी दिलेल्या भेटी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने कारखान्यास दिनांक ६.९.२०१७ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले होते. तद्नंतर सदर उद्योगामार्फत प्रस्तावित आदेशातील त्रुटींची पूर्तता करण्यात आली आहे. तथापि, सदर उद्योग आर्थिक कारणास्तव मागील एक वर्षापासून बंद आहे.

(३) गो-हे गावातील पशुधन आजाराने / उष्माघाताने मृत पावल्याच्या घटनेच्या अनुषंगाने संबंधित कंपनीकडून सामाजिक दायित्वापोटी संबंधित शेतक-यांना आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

औरंगाबाद शहरातील बिबी का मकबराचे वाहनाचा धूर व प्रदूषणामुळे होत असलेली हानी

(११) ९०३७२ (२१-०८-२०१७) श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील जगातील वारसा स्थळ असलेल्या बिवी का मकबरा परिसरातील पर्यटकांच्या वाहनाच्या धुरामुळे कार्बन मोनाक्साइड आणि सल्फर डायऑक्साइड मुळे आम्ल वर्षावाची परिस्थिति निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मकबरा परिसरातील वीटभट्ट्यातील निघणाऱ्या कार्बन डायऑक्साइड मुळे आम्ल वर्षाव होऊन मकबऱ्यावरील संगमरवरातील कल्शियम कार्बोनेट वितळत असल्याने मकबरा काळवंडला असून भिंतीवर धूळ साचते व पावसाळ्यात पाणी पडताच किटक भिंती खोलवर उकारतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त मकबरा सुस्थितीत राहण्याकरिता व प्रदूषणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम (२१-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांच्या आदेशानुसार उप-अधिकक्ष पुरातत्व रसायनज्ञ पश्चिम खंड, बिबीका मकबरा, औरांगाबाद यांचे दिनांक १८.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये बीबीका मकबरा परिसरातील विटभट्टया हलविण्यात आल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

मुंबईतील प्रदुषणात वाढ झालेली असताना प्रदूषण नियंत्रण मंडळ निष्क्रीय असल्याबाबत

(१२) ९५१४३ (३०-१२-२०१७) श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये औद्योगिकरणाबरोबरच लोकसंख्या व वाहनांची वाढणारी संख्या त्यामुळे प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून प्रदूषणात मुंबईचा राज्यात पहिला तर देशात तिसऱ्या क्रमांक असल्याचे 'सफर' या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई महापालिकेच्या पर्यावरणीय अहवालानुसार ध्वनीची मोजणी होणाऱ्या १२०० हून अधिक ठिकाणांपैकी फक्त ७ ठिकाणी आवाज मर्यादित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईची हवा बाधित करणाऱ्या घटकांचे प्रमाण कमी कसे होईल यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यरत असणे आवश्यक असताना प्रत्यक्षात उक्त मंडळ अकार्यक्षम असल्याची बाब पर्यावरण अभ्यासकांच्या माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईमध्ये ११ ठिकाणी हवा गुणवत्तासाठी नियंत्रण केंद्र सन २०१७ मध्ये स्थापन करण्याचे आदेश असूनही माहे सप्टेंबर, २०१७ अखेर एकही केंद्र उभारण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कारखान्यांना परवानगी देताना अपेक्षित काम केले जात नसल्याची बाब वनशक्तीचे प्रकल्प अधिकाऱ्याने निदर्शनास आणून प्रदूषण नियंत्रण मंडळ लहान कारखान्यावर कारवाई करते, मात्र मोठ्या कारखान्यांवर कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार प्रदूषणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली व प्रदूषणाला प्रतिबंध घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम (२१-०२-२०१९) : (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) मुंबईमध्ये १० ठिकाणी CAAQMS च्या उभारणीचे काम पूर्ण झालेले असून ती स्थानके पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत झालेली आहेत.
१) सायन २) कुर्ला ३) वरळी ४) कुलाबा ५) बोरीवली ६) कांदीवली ७) पवई ८) विलेपार्ले
९) विमानतळ १०) मुलुंड
(५) हे खरे नाही.
(६) प्रश्न उदभवत नाही.

मुंबई शहर व राज्यात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आणण्याबाबत

(१३) ९५६१८ (०५-०१-२०१८) श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या अतिवृष्टीत सर्वत्र पाणी साठण्यासाठी प्लास्टिकच्या पिशव्यांचा कचरा कारणीभूत असल्याने मुंबई सह राज्यात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्लास्टिक पिशव्यांना पर्याय म्हणून कोणत्या प्रकारच्या पर्यावरणपूरक पिशव्या बाजारात वापरता येतील याबाबत अनेक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई शहर व राज्य प्लास्टिक मुक्त करण्यासाठी महानगरपालिका व अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांकडून यापूर्वी झालेले प्रयत्न अयशस्वी झाल्याने शासनाने प्लास्टिकचे उत्पादन व विक्री यावर बंदी आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच प्लास्टिक पिशव्यांवरील बंदी संदर्भात प्रसारमाध्यमांतून जनजागृती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम (२६-०९-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) होय
(३) प्लास्टिक बंद संदर्भात व्यापक स्तरावर जनजागृती अभियान राबविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

शासनाकडून पुरस्कार प्राप्त ठकाबाबा गांगड यांचे मानधन प्रलंबित असल्याबाबत

(१४) ९६१२७ (१३-१२-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाचे सन्माननीय पुरस्कार मिळणाऱ्या व्यक्तींना वृध्दापकाळात शासनाकडून दुर्लक्षित केले जात असून सद्यस्थितीत महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी गिरीजन पुरस्कार विजेता ठरलेला ठका बाबांच्या घरची परिस्थिती फारच हलाखीची असल्याने, शासनाकडून दिले जाणारे मानधन हे बऱ्याच महिन्यांपासून त्यांना दिले गेले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत ठकाबाबा गांगड यांच्या मेंदूत रक्तस्त्राव झाल्याने त्यांना भंडारदरा येथील धन्वंतरी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०७-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.

श्री.ठका कृष्णा गांगड यांना सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून मानधन मंजूर करण्यात आले आहे. दिनांक सप्टेंबर, २०१६ ते डिसेंबर, २०१८ या कालावधीचे मानधन श्री. गांगड यांच्या खात्यावर जमा झाले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) जिल्हा सामान्य रुग्णालय, नाशिक येथे उपचार घेण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खानापूर चित्ता (जि.हिंगोली) येथे सार्वजनिक शौचालयाला मंजूरी मिळण्याबाबत

(१५) ९६८६२ (२९-१२-२०१७) श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर चित्ता (ता.जि.हिंगोली) येथे गत आठ वर्षापासून सार्वजनिक शौचालय नसल्यामुळे नागरिकांची विशेषत: महिलांची गैरसोय होत असून अनेक वेळा याप्रकरणी ग्रामपंचायतीने प्रस्ताव पाठवले तरीही सार्वजनिक शौचालयाला मंजूरी मिळाली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील ५० शौचालयधारकांनी प्रस्ताव तयार करुन ग्रामपंचायतीमार्फत तालुका स्तरावर पाठवले आहेत परंतू याकडे संबंधीत विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त गावात सार्वजनिक शौचालय तसेच शौचालयांच्या प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१३-०२-२०१९) : (१) व (२) हे खरे नाही.
याबाबत कोणताही प्रस्ताव हिंगोली पंचायत समितीस्तरावर प्राप्त झालेला नाही.
(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. परंतु सार्वजनिक शौचालयाचा प्रस्ताव पंचायत समितीकडे प्राप्त झाल्यास तपासून त्यावर योग्य निर्णय घेण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला (जि.अकोला) शहरातील वाढते प्रदूषण रोखण्याबाबत

(१६) ९८८३२ (३०-१२-२०१७) श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि.अकोला) शहरातील टिळक रोड, रणपिसे नगर, एमआयडीसी वसाहत या ठिकाणी सर्वाधिक प्रदूषण असल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण विभागाकडून केलेल्या पाहणीत माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शहरातील वीट भट्या, टायर उत्पादनापासून ते बेकरी पर्यंत निर्मिती उद्योग, शहरातील कारखाने यांमुळे मोठया प्रमाणावर प्रदुषण होत असल्याने प्राधिकरणाकडून प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, समाजसेवी संस्था व संघटना यांनी अनेकवेळा मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महापालिकेच्या खर्चापैकी २५ टक्के निधी प्रदूषणाचा स्तर सुधारण्यासाठी खर्च करण्याबाबतची सूचना राष्ट्रीय परिषद मुंबई येथे बैठकीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अकोला जिल्हयातील प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, सदरहू प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम (१२-०२-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय हे खरे आहे.
(४) सन-२०१८-२०१९च्या अंदाजपत्रकामध्ये घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी प्रकल्पासाठी महानगरपालिकेने पर्यावरण पुरक प्रकल्प या लेखाशिर्षाखाली ७ कोटी रूपयाची भरीव तरतूद केली आहे.तसेच मलनिस्सारण योजनेला शासनाची मंजूरी प्राप्त झाली असून रू.७९.२३ लक्ष चा डीपीआर मंजूर आहे.त्यापैकी रू.१५.८४ लक्ष तरतूद प्राप्त झालेली असून मलनिस्सारणाची कामे सुरू करण्यात येणार आहेत.
(५) प्रश्न उदभवत नाही.

नाहूर (प) भांडूप गाव (मुंबई) येथील परिसरामध्ये क्लासिक मार्बल कंपनीमुळे झालेले प्रदूषण

(१७) १०२१८७ (३०-१२-२०१७) श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील नाहूर (प) भांडूप गाव येथील क्लासिक मार्बल कंपनीने बेकायदेशीरपणे लादीचे तुकडे पाडण्याचे काम सूरु करून धूरामुळे व ध्वनी प्रदूषणामूळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नागरिकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी पर्यावरण विभाग गोवंडी, मुंबई यांना सदर कंपनीची पाहणी करुन कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,केलेल्या कारवाईची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम (२१-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.
वैद्यकिय आरोग्य अधिकारी, मुंबई महानगरपालिका यांनी कारखान्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर कोणताही परिणाम होत नाही असे कळविले आहे.
(२) व (३) होय हे खरे आहे.
लोकप्रतिनिधींच्या तक्रारीच्या अनुषंगाने सदरील उद्योगास प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्यात आली व आढळुन आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने सदरील उद्योगास दि. २१/११/२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावलेली आलेली होती व ०६/०१/२०१८ रोजी कारखाना बंद करण्याचे नोटीस पारित करुन कारखान्याचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आलेला होता.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण, देवगड तसेच वेंगुर्ले तालुक्यातील धुपप्रतिबंधक बंधारे बांधण्यासंदर्भातील प्रस्तावाबाबत

(१८) १०२७९३ (३०-१२-२०१७) श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यातील मसुरकर जुआबेट, मसुरकर खोत जुआ, देवबाग ते तारकर्ली, तळाशिल समुद्र किनारी, सर्जेकोट पिरवाडी, हडी बंदर, श्रीकृष्ण मदिर ते मोरेश्वर मंदिर तसेच देवगड तालुक्यातील हिंदळे, वानिवडे सरवणकरवाडी, मिठमुंबरी, बागमाळागाव, मुंनगे विराचापार तसेच वेंगुर्ला तालुक्यातील मानसीश्वर किक, उभादांडा, नवाबाग, भोगवे किल्ले निवाती, सागरेश्वर कुर्लेवाडी, वायंगणी (पोयडेवाडी), नवाबाग उभादांडा (खाडीच्या बाजुस), नेवाळे गड ते भोगवे, आदि सन २०१६-२०१७ ते २०१७-१८ या कालावधीतील धुप प्रतिबंधक बंधारे बांधण्यासंदर्भातील सी आर झेड मंजूरीसाठीचे प्रस्ताव संबंधित विभागाकडे सादर करण्यात आले असतांनाही अदयाप सी आर झेड ची मंजूरी मिळाली नसल्याचे माहे नोव्हेंबर,२०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त धुपप्रतिबंधक बंधारेचे प्रस्ताव सी.आर झेड च्या मंजूरीअभावी शासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रलंबित प्रस्तावांना तात्काळ मंजूरी देण्याकरिता राज्य शासनाने तसा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर केला आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावांना केव्हापर्यत मंजूरी मिळण्याचे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम (०६-०२-२०१९) : (१) व (२) अंशत खरे आहे.

(३) सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यातील मसुरकर जुआबेट, मसुरकर खोत जुआ, देवबाग ते तारकर्ली व देवगड तालुक्यातील हिंदळे, वानिवडे सरवणकरवाडी, मिठमुंबरी, बागमाळागाव, मुणगे विराचापार, तसेच वेंगुर्ले तालुक्यातील मानसीश्वर क्रिक, उभादांडा नवाबाग, भोगवे किल्लेनिवाती, सागरेश्वर कुर्लेवाडी या धुपप्रतिबंधक बंधारे बांधण्यासंदर्भातील प्रस्ताव महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दि. २१.०८.२०१८ रोजी झालेल्या १२५ व्या बैठकीत घेण्यात आले होते. या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, मालवण तालुक्यातील मसुरकर जुआबेट, मसुरकर खोत जुआ, देवबाग ते तारकर्ली व देवगड तालुक्यातील हिंदळे, वानिवडे सरवणकरवाडी, बागमाळागाव, तसेच वेंगुर्ले तालुक्यातील सागरेश्वर कुर्लेवाडी असे एकूण ७ धुपप्रतिबंधक बंधारे बांधकामासाठी राज्य स्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाकडे पर्यावरणीय अनुमती करिता शिफारस करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ११ जिल्हे २०४ तालुके आणि २२३१० ग्रामपंचायती या हागणदारी मुक्त म्हणून घोषित करण्यात आल्याबाबत

(१९) १०४८४८ (०५-०४-२०१८) श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ११ जिल्हे २०४ तालुके आणि २२३१० ग्रामपंचायती या हागणदारी मुक्त म्हणून घोषित करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित भागात ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्याला रुपये ३६०० कोटींचा निधी आवश्यक असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील प्रमुख नद्याची स्वच्छता मोहीम सुरु करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आवश्यक निधी राज्य सरकार कशाप्रकारे उपलब्ध करणार आहे,

(५) तसेच नद्यांच्या स्वच्छता मोहिमेची अंमलबजावणी कशाप्रकारे करणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१३-०२-२०१९) : (१) डिसेंबर, २०१७ मध्ये राज्यातील १३ जिल्हे, २०८ तालुके, २२६४९ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त घोषित करण्यात आल्या होत्या.

(२) वार्षिक कृती आराखडयानुसार (सर्व उपंगासाठी) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) योजनेसाठी सन २०१७-१८ वर्षात केंद्र हिस्स्याच्या रु.३६००.६४/- कोटी इतक्या रक्कमेची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी सन २०१७-१८ या वर्षात केंद्र शासनाकडून रु.११५५३२.७१ लक्ष इतका निधी प्राप्त झाला.

सन २०१८-१९ या वर्षात केंद्र शासनाकडून आतापर्यंत स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत रु.१३५२९२.१९ लक्ष इतका निधी प्राप्त झाला असून ६०:४० या केंद्र व राज्य हिस्सा तत्वानुसार राज्याने राज्य हिस्सा उपलब्ध करुन दिला आहे.

(३), (४), (५) व (६) पर्यावरण विभागाच्या शासन निर्णय क्र.संकिर्ण २०११/प्र.क्र.२५/तां.क.१, दिनांक ०१/०३/२०१४ अन्वये राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत मार्गदर्शक सूचनांनुसार नदी संवर्धनाबाबत पर्यावरण विभागाकडे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते.

गडचांदुर (जि.चंद्रपुर, ता.कोरपना) येथील माणिकगड सिमेंट कंपनी व पॉवर प्लँटमुळे होत असलेले वायु प्रदुषण

(२०) ११०६२९ (०६-०४-२०१८) ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचांदुर (ता.कोरपना, जि.चंद्रपुर) येथील माणिकगड सिमेंट कंपनी व पॉवर प्लँटच्या वायू प्रदुषणामुळे गडचांदुर शहरातील नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपुर जिल्हयातील राजुरा विधानसभा क्षेत्रातील माणिकगड सिमेंट कंपनी लगत असलेल्या मुख्य रस्त्यावर कंपनीच्या अवैध वाहनामुळे अतिक्रमण व प्रदुषण होत असल्याचे माहे. जानेवारी २०१८ वा त्यादरम्यान निर्देशनास आले हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, सदर कंपनीच्या पॉवर प्लँटच्या चिमणीतून केमिकल मिश्रीत धुळ निर्माण होत असून सदर रासायनिक वायुमुळे प्रदुषणाची गंभीर समस्या गडचांदुर शहरात निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वायु व जल प्रदुषण पसरविणा-या उदयोगांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२१-०२-२०१९) : (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

धुरांड्यातून उत्सर्जित होणाऱ्या प्रदूषकांचे प्रमाण विहीत मानकांच्या मर्यादेत आढळून येते.

(४) म.प्र.नि. मंडळाने माणिकगड सिमेंट या कारखान्याची दि. २४/०१/२०१८ रोजी पाहणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींस अनुसरुन कारणे दाखवा नोटीस बजावून संमतीपत्राच्या अटी शर्तीनूसार कारखान्याने दिलेल्या रू. ५.० लाखाची बँक हमी दि. २६/०४/२०१८ रोजी जप्त करून दुप्पटीने (रू. १० लाख) बँक हमी घेण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्रेयस सिनेमा (घाटकोपर,मुंबई) परिसरातील प्रदूषणाबाबत

(२१) ११२०५५ (१४-०४-२०१८) श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एलबीएस मार्गावरील वाढती वाहतूक कोंडी, रस्त्यांचा खालावलेला दर्जा यामुळे घाटकोपर येथील श्रेयस सिनेमाचा परिसर प्रदूषणाच्या विळख्यात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणानुसार शहरात घाटकोपर, शीव, वांद्रे आणि भांडूप या परिसरातील धुळीमुळे सर्वाधिक प्रदुषण होत असल्याची नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२१-०२-२०१९) : (१) हे अंशतः खरे आहे.

मुंबईतील अविरत सुरु असलेली बांधकामे, वाहनांच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ यामुळे वातावरणातील धुळीचे प्रमाण वाढत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

म.प्र.नि.मंडळाकडून २ ठिकाणी सायन व बांद्रा या ठिकाणी हवेची गुणवत्ता मोजली जाते. यामध्ये हवेतील धुलिकनांचे प्रमाण माहे नोव्हेंबर, २०१७ ते जानेवारी, २०१८ या दरम्यान काही प्रमाणात वाढल्याचे आढळते.

(३) व (४) म.प्र.नि. मंडळाने मुंबई शहरातील वाढत्या प्रदूषणावर आळा घालण्याकरीता कृती आराखडा तयार करण्याचे काम आयआयटी, मुंबई व निरी (NEERI) या संस्थाना दिले आहे. सदरील कृती आराखडा तयार करण्याचे काम हे प्रगतीपथावर आहे.

हिंगोली स्वच्छता भारत मिशन शौचालयाचे बांधकाम निधीअभावर प्रलंबित असल्याबाबत

(२२) ११२५६२ (१४-०४-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यासाठी पांदनमुक्तीसाठी जिल्हा परिषदेच्या अंतर्गत शौचालय बांधण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. परंतू लाभार्थ्यांना शौचालय बांधकाम करण्यासाठी निधी वेळेवर मिळत नसल्यामुळे माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्यामुळे शौचालयाची कामे संथगतीने चालू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१३-०२-२०१९) : (१) होय,

हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

पायाभूत सर्वेक्षण २०१२ नुसार महाराष्ट्र राज्य ग्रामीण दिनांक १८ एप्रिल २०१८, रोजी हागणदारीमुक्त घोषित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर आणि वरोरा तालुक्यात वीज निर्मिती प्रकल्प व औद्योगिक कंपन्यांमुळे होणारे प्रदूषण

(२३) ११३०३४ (२४-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि. चंद्रपूर) तालुक्यात वीज निर्मिती करणाऱ्या खाजगी प्रकल्पामधून मागील काही महिन्यापासून राख हवेद्वारा सोडण्यात येत असून त्यामुळे वरोरा शहर व ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच चंद्रपूर जिल्हयात प्रदूषणामुळे १२४५३ नागरीक गंभीर स्थितीत रूग्णालयात उपचार घेत असून ३२५ नागरीकांचा प्रदूषणामुळे मृत्यु झाल्याची माहिती वैद्यकिय महाविद्यालय रूग्णालयातील आकडेवारी वरून निदर्शनास आले असल्याने प्रदुषणाच्या बाबतीत उक्त जिल्हयाचा देशात चौथा व राज्यात पहिला क्रमांक असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्हयातील औद्यागिक कंपन्यांचे सांडपाणी तसेच चिमणीतुन निघणारा धुर कोळसा व वाहतुकीच्या प्रदुषणामुळे दमा, हृदयरोग, त्वचारोग, डोळयाचे आजार, क्षयरोग, यासारखे गंभीर आजार होउन नागरीकांचे आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित प्रकल्प मालक व औद्योगिक कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२१-०२-२०१९) :

(१) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्हयातील वरोरा तालुक्यात कोळशावर आधारित वीज निर्मिती करणारे दोन खाजगी प्रकल्प असून कारखान्यातून उत्सर्जित होणाऱ्या धुरातील धुलीकण/राखेतील धुलीकणांवर नियंत्रणासाठी आवश्यक ती सयंत्रणा बसविलेली आहे. धुरांड्याचे व वातावरणातील हवेचे पृथ:करणाकरिता नमुने वेळोवेळी गोळा करण्यात येतात, पृथ:करण अहवाल विहीत मर्यादेत असल्याचे आढळून येते.

(२) व (३) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला असून अहवालावरून जनतेच्या आरोग्यावर परिणाम झाला असल्याचे दिसून येत नाही. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने डिसेंबर २००९ मध्ये भारतातील ८८ औद्योगिक क्षेत्र/समुहाचे विस्तृत पर्यावरण मुल्यांकन केले असून चंद्रपूर जिल्हयातील काही औद्योगिक क्षेत्र /समुहाचे

मुल्यांकन गंभीर प्रदूषित क्षेत्राच्या श्रेणीत केले आहे. चंद्रपूर क्षेत्राला भारतातील चवथे प्रदुषित क्षेत्र अनुक्रंमाक देण्यात आले असून एकुण ८३.८८ गुण देण्यात आले. २०१३ अखेर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषकांची तपासणी केली असता चंद्रपूर क्षेत्राचे CEPI ranking ८३.८८ पासून ८१.९० पर्यंत खाली आले असून, चंद्रपूर अतिप्रदूषित श्रेणीच्या सहाव्या क्रमांकावर खाली आले होते. कृती आराखड्याच्या कालाधीतील निष्कर्षांना गृहीत धरुन व अतिप्रदूषित क्षेत्रातील २०१३ च्या ८१.९० च्या मुल्यांकनाशी तुलना केली असता सध्याचे पुनर्मुल्यांकन ५४.४२ जे ७० पेक्षा कमी असल्याने अधिस्थगन अटींसह उठविण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

मुंबईतील हवेचा दर्जा तपासणे व प्रदूषण रोखण्यासाठी अतिरिक्त हवा गुणवत्ता सनियंत्रण केंद्र कार्यान्वित करण्याबाबत

(२४) ११५६५० (१४-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील हवेच्या दर्जाची माहिती देण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून (एमपीसीबी) शीव व वांद्रे येथे सनियंत्रण स्थानके आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास स्थानकांच्या मर्यादा लक्षात घेवून आणि केंद्रीय वने व पर्यावरण खात्याच्या नियमावलीनुसार १३ नवीन स्थानके महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तयार करणार असल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास प्रदूषणाबाबतची माहिती घेण्यासाठी आणि ते रोखण्यासाठीची स्थानके कोठे कार्यान्वीत करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२१-०२-२०१९) : (१) होय. मुंबई मध्ये मुंबईच्या हवेच्या दर्जाची माहिती देण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून एमपीसीबी) एकूण ११ ठिकाणी सनियंत्रण केंद्रे बसविण्यात आलेली आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

मुंबई येथे १ ठिकाणी मानवचलीत व १० ठिकाणी स्वयंचलीत (CAAQMS) सनियंत्रण केंद्रांच्या उभारणीचे कार्य पूर्ण झालेले असून ती स्थानके पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत झालेली आहेत.

(३) प्रदूषणा बाबतची माहिती घेण्यासाठी मुंबईमध्ये १० ठिकाणी सतत वातावरणीय हवा गुणवत्ता सनियंत्रण केंद्र कार्यन्वीत केलेले आहेत १. सायन,२. कुर्ला, ३. वरळी,४. कुलाबा, ५. बोरीवली, ६. कांदीवली, ७. पवई, ८. विलेपार्ले, ९. विमानतळ, १०. मुलुंड

(४) प्रश्न उदभवत नाही.

राज्यातील अनेक जिल्हयांमध्ये दुषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

(२५) ११८३१७ (२५-०७-२०१८) श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निम्म्यापेक्षा अधिक जिल्हयात दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरीकांच्या आरोग्याच्यादृष्टीने स्वच्छ पाणीपुरवठा करणे तसेच साथीच्या रोगांवर प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२१-०२-२०१९) : (१) एप्रिल, २०१८ मध्ये राज्यातील एकूण पाणी नमुन्यापैकी ९% पाणी नमूने पिण्यासाठी अयोग्य आढळले आहेत. एप्रिल २०१८ मध्ये राज्यात ७ जिल्हयात जलजन्य आजाराचे एकूण १७८ रूग्ण आढळले आहेत.

(२) साथीच्या रोगांवर प्रतिबंध घालण्यासाठी शासनाकडून पुढील उपाययोजना करण्यात येत आहेत.

(i) सर्व जल स्त्रोतांचे वर्षातून दोन वेळा पाणी नमुने गोळा करून तपासणी करणे.

(ii) सर्व स्त्रोतांवर पाण्यात मिसळण्यासाठी ग्राम पंचायतीद्वारे TCL पावडर उपलब्ध करून देण्यात येते.

(iii) पाणी शुध्दीकरणासाठी जलसुरक्षकांचे नियमित प्रशिक्षण घेण्यात येते.

(iv) ग्रामविकास व पाणी पुरवठा विभागाच्या समन्वयाने वर्षातून दोन वेळा नियमित स्वच्छता सर्वेक्षण करण्यात येते.

(v) जलशुध्दीकरण यंत्रणा (RO/DFU) बसवून शुध्द पाणी पुरवठा करण्यात येत आहे. RO-II प्रकल्पांतर्गत राज्यातील १३१ गावे/वाड्यात RO बसविण्याचे प्रस्तावित असून त्यापैकी ६४ RO यंत्रणेचे काम पुर्ण होऊन ग्रामस्थांना शुध्द पाण्याचा पुरवठा होत आहे. RO III प्रकल्पांतर्गत राज्यातील ३२५ गावे/वाड्यांत RO बसविण्याचे प्रस्तावित आहे. राज्यातील १२२ फ्लोराईडबाधित गावे/वाड्यात DFU बसविण्याचे प्रस्तावीत असून त्यापैकी ७६ DFU यंत्रणेचे काम पुर्ण होऊन ग्रामस्थांना शुध्द पाण्याचा पुरवठा होत आहे.

(vi) राज्यात पाणी नमुने तपासण्याकरिता १३८ प्रयोगशाळांचे बळकटीकरण करण्यात आले आहे.

(vii) जलसुरक्षकांना उद्दिष्टानुसार पाणी नमुने गोळा करण्याचे काम यशस्वी करण्यास प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो.

(viii) नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत राज्यस्तरावरून विशेष पाठपुरावा करण्यात येत आहे.

(ix) जलजन्य आजाराचे नियमित सर्वेक्षण करण्यात येत आहे.

(x) जलजन्य आजारासाठी आरोग्य संस्थांना औषध पुरवठा करण्यात येतो.

(xi) जलजन्य आजार प्रतिबंधासाठी जनतेचे आरोग्य शिक्षणाबाबत प्रबोधन करण्यात येते.

(xii) दूषित स्त्रोत बंद केल्यास पिण्याच्या पाण्यासाठी पर्यायी स्त्रोत उपलब्ध करून देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गडचांदूर (जि.चंद्रपूर) येथील माणिकगड सिमेंट उद्योगामूळे होत असलेले प्रदुषण

(२६) १२२०८८ (२३-०७-२०१८) श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचांदूर (जि.चंद्रपूर) येथील माणिकगड सिमेंट उद्योगामूळे परिसरातील हवा प्रदूषीत होवून नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम हाेत असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सिमेंट उद्योगावर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२१-०२-२०१९) : (१) हे खरे आहे.

वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, गडचांदूर, जि. चंद्रपूर यांचेकडून सदर प्रश्नाच्या अनुषंगाने दि. ०६/०६/२०१८ रोजीच्या प्राप्त पत्रानुसार, गडचांदूर येथील माणिकगड सिमेंट कंपनी व पॉवर प्लांटच्या वायु प्रदूषणामुळे गडचांदूर शहरातील नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी-२०१८ मध्ये निदर्शनास आले असल्याचे कळविलेले आहे.

(२) म.प्र.नि. मंडळाने माणिकगड सिमेंट या कारखान्याची दि. २४/०१/२०१८ रोजी पाहणी करून त्रुटींची पुर्तता करण्यास दि.०७/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. कारखान्याने त्यांचे पत्र दि. १२/०३/२०१८ अन्वये म. प्र.नि. मंडळाच्या पाहणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची पूर्तता करीत असल्याचा अहवाल सादर केला. सदर अहवाल समाधानकारक नसल्याने दि. २८/०३/२०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली व दि. ०३/०४/२०१८ रोजी पाहणी करून संमतीपत्राच्या अटी शर्तीनूसार कारखान्याने दिलेल्या रू. ५.० लाखाची बँक हमी दि. २६/०४/२०१८ रोजी जप्त करून दुप्पटीने (रू. १० लाख) बँक हमी घेण्यात आलेली आहे. दि. ११/०४/२०१८ अन्वये कारखान्याने योग्य उपाययोजना केल्या आहेत व काहीचे पूर्तता करण्याबाबत कळविले असून त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मस्जीद बंदर येथील ठक्कर टेस्टी चिवडा दुकानात निकृष्ट दर्जाच्या खाद्य पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

(२७) १२६४१० (२३-१०-२०१७) श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील २७/२९, युसूफ मेहर अली रोड, मस्जीद बंदर येथील ठक्कर टेस्टी चिवडा दुकानात नियमबाह्यरित्या व निकृष्ट दर्जाच्या खाद्य पदार्थांची विक्री होत असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश बापट (२७-१२-२०१८) : (१) हे खरे नाही. अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल व उरण (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासींना अंत्योदय योजनेचा लाभ मिळण्याबाबत

(२८) १२६५७३ (२९-१२-२०१८) श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल व उरण (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासींना अंत्योदय योजनेचा लाभ मिळत नसल्याने त्यांनी पनवेल प्रांत कार्यालयावर दिनांक ७ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढून निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींकडे घरपट्टीची पावती नसल्याने त्यांना अंत्योदय योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त आदिवासींच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व आदिवासींना अंत्योदय योजनेचा लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. गिरीश बापट (०१-०२-२०१९) : (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) श्रमजीवी आदिवासी संघटना यांनी तहसलिदार ता. पनवेल व उरण, जि.रायगड यांना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ, दक्षता समितींवरील नियुक्ती, आदिवासींच्या शिधापत्रिकेवर खाद्यतेल, डाळी व साखर उपलब्ध करुन देण्याबाबत इ. मागण्यांसाठी निवेदन देण्यात आले आहे.

अंत्योदय अन्न योजनेच्या निकषांनुसार तसेच, शासन निर्णय दिनांक २३.०१.२००८ व दिनांक १७.१२.२०१३ नुसार सदर मागण्यांच्या अनुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड, तहसिलदार, ता.पनवेल व उरण, जि.रायगड व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांच्याकडून कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

धर्माबाद (जि.नांदेड) येथील पायोनियर डिस्टिलरी कंपनीकडून होत असलेल्या प्रदुषणाबाबत

(२९) १२७१०९ (२९-१२-२०१८) श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (जि.नांदेड) शहराजवळ असलेल्या अल्कोहोल व दारुचे उत्पादन करीत असलेल्या पायोनियर डिस्टिलरी कंपनीच्या प्रदुषणामुळे तेलगंणा राज्यातील बासर येथील राजीव गांधी आयआयटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याची तक्रार तेलगंणा शासनाने प्रदुषण विभागाकडे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीचे संपूर्ण उत्पादन बंद झाल्यामुळे कंपनी व शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान होत असून कंपनीत रोजंदारीवर काम करणा-या कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम (११-०२-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सविस्तर पाहणी करण्यात आली व पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने तसेच संमतीपत्राच्या अटी/शर्तीचे कारखाण्याने उल्लंघन केले असल्यामुळे सदर कारखान्यास महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने दिनांक २६ जुलै, २०१८ रोजी उत्पादन बंद करण्याचे आदेश दिले होते व सदर कारखान्याची रुपये ५ लक्ष बँक हमी जप्त करण्यात आली होती.

कारखान्याकडून आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता, उपाययोजना व प्रदूषण नियंत्रण सनियंत्रणा अद्यावत करण्याविषयीचा प्रस्ताव संबंधित प्रकल्प प्रवर्तकाकडून प्राप्त झाला होता. त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजी सुनावणी घेऊन प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बाबत केलेल्या व करण्यात येणा-या कामाचा आढावा घेऊन काही अटी व शर्तीच्या अधीन राहून उत्पादन चालू करण्याकरिता दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या पत्रान्वये अंतरिम निर्देश पारित केले. सदर अंतरिम निर्देशामधील अटी व शर्तीची पूर्तता करण्याकरिता कारखान्याकडून रुपये ३५ लक्ष एवढी बँकहमी घेण्यात आलेली आहे.

मे. पायोनियर डिस्टीलरीज कारखान्याने प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा अद्ययावत केलेली असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या अंतरिम निर्देशाच्या अनुषंगाने औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता मल्टीस्टेज मल्टीइफेक्ट यंत्रणा प कंडेन्सेट पॉलीशींग युनीट यंत्रणा बसवली असून ती कार्यान्वित आहे. तसेच घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता सांडपाणी सयंत्रणा बसवलेली असून ती कार्यान्वीत आहे व कारखान्याच्या परिसरात असलेले कच्चे लगून पूर्णपणे नष्ट केले आहे. कारखान्याने हवा प्रदूषण सनियंत्रणाकरिता बॉयलरला ईएसपी (Electrostatic Precipitation - ESP) ही अद्यावत यंत्रणा बसविण्यात आली असून ती कार्यान्वीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हा प्रशासनातील अन्न नागरी पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(३०) १२७६०७ (२९-१२-२०१८) श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा प्रशासनातील अन्न नागरी पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांची महत्वाची तीन पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत, ही रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (०४-०२-२०१९) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) जिल्हा पुरवठा अधिकारी, कोल्हापूर व सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी, कोल्हापूर या दोन अधिकाऱ्यांची पदे बदली झाल्याने अनुक्रमे दि .०१/०९/२०१८ व दि .३०/०८/२०१८ पासून रिक्त झाली आहेत. सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी हे पद दि .२४/१०/२०१८ रोजी भरण्यात आले आहे. सहा. लेखाधिकारी पदावरील अधिकाऱ्यांची पदोन्नती झाल्याने हे पद दि .१०/०७/२०१८ रोजी रिक्त झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील चित्रनगरीला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(३१) १२७६१९ (२९-१२-२०१८) श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील चित्रनगरीला निधीचा तुटवडा असल्याने काम प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी उपलब्ध होऊन सदर काम तातडीने पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) : (१) नाही.

(२) कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या पुनर्विकास प्रकल्पाकरीता शासन निर्णय दि.२९.११.२०१८ अन्वये सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाकरीता रु. २,१०,००,०००/- (रुपये दोन कोटी दहा लाख फक्त) इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच त्यांचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी शासन निर्णय दि.१२.१२.२०१८ अन्वये रु.२०,०७,०६०/- (रुपये वीस लाख सात हजार साठ फक्त) इतका निधी मंजूर करण्यात आला असून आवश्यक ती कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोल्हापूर शहरातील रंकाळा तलावातील प्रदुषण कमी करण्याबाबत

(३२) १२७६६० (२९-१२-२०१८) श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील रंकाळा तलावात सांडपाणी सोडले जात असल्याने तलावाचे पाणी दुषित होऊन ब्लू ग्रीन ऍलगीचे संकट निर्माण होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रंकाळा तलावाचे प्रदूषण कमी करण्याबाबत शासन स्तरावर कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२१-०२-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.

रंकाळा तलावामध्ये पावसाळा कालावधी व्यतिरिक्त सांडपाणी मिसळू नये म्हणून शाम सोसायटी नाला, देशमुख हॉल नाला, सरनाईक कॉलनी नाला व परताळा नाला इ. नाले अडवून ड्रेनेज व्यवस्थेकडे वळविणेत आले आहेत. तथापि, पाऊस सुरु होताच हे नाले अडविणे शक्य होत नाही. पावसाचे पाण्याबरोबर अडवलेल्या नाल्यांतील अतिरिक्त सांडपाणी तलावात मिसळण्याची शक्यता असते व त्याचा परिणाम कालांतराने ब्लू ग्रीन ऍलगी निर्माण होणे यामध्ये होतो.

(२) कोल्हापूर महानगरपालिकेकडून याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत :- पावसाळा संपलेनंतर सांडपाणी रंकाळा तलावात मिसळणे थांबविले जाते. सदर सांडपाणी केंद्रशासनाचे राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेमधून टाकणेत आलेल्या शाम सोसायटी नाला ते जाऊळाच्या गणमती ते राबाडे पंपींग स्टेशन पर्यंत मैलासांडपाणी वळविणेसाठी टाकलेल्या पाईप मधून वळविले जाते. पावसाळयाच्या कालावधीत पावसाचे पाण्याबरोबर मैलासांडपाणी तलावात मिसळू नये म्हणून तलावाचे कॅचमेंट क्षेत्रात केंद्रशासनाचे अमृत योजनेअंतर्गत भुयारी गटर करणेचे काम प्रगतीपथावर असून सदरील काम २४ ऑक्टोंबर, २०१७ पासून सुरु करणेत आलेले आहे. सदरील काम पूर्ण करणेसाठी पुढील ३० महिन्यांची मुदत देणेत आली आहे. याअनुषंगाने सदरील काम माहे एप्रिल, २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

ब्लू ग्रीन ऍलगी चा फैलाव कमी करणेसाठी तात्काळ उपाय योजना म्हणून बोटींव्दारे प्राणवायू वाढविणे आवश्यकतेनुसार पी.ए.सी. पावडरचा डोस देणे व हिरवे पाणी बाहेर जाणेसाठी व्यवस्था अशी उपाययोजना करणेत आली आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीचा "नमामि" योजनेत समावेश करणेबाबत

(३३) १२७९२३ (२९-१२-२०१८) श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीला 'नमामि पंचगंगा' असा दर्जा देणे तसेच शासनाकडून निधी उपलब्ध होण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव कोल्हापूर, पर्यावरण विभाग यांनी पुणे विभागीय आयुक्त यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'नमामि पंचगंगा' या योजनेच्या पहिल्या टप्प्याच्या कामांना शासनाने निधी मंजूर केला आहे काय, असल्यास त्यापैकी किती निधी वितरित करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, ही योजना लवकरात लवकर पुर्ण होण्याच्यादृष्टीने शासनस्तरावर कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम (११-०२-२०१९) : (१) नमामी पंचगंगा प्रारुप अहवाल प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०१८ च्या मेलव्दारे विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे सादर केला आहे.

(२) व (३)

• इतर विभागांमार्फत करण्यात येणा-या उपाययोजनांसाठी एकूण लागणारा निधी, उपलब्ध असलेला निधी, निधीची तरतूद इ. दूरदृष्टीकोनातून सदर अहवाल अद्याप अपूर्ण असल्याने ते पूर्ण करण्याचे काम प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांचे कार्यालयाच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.

• परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्यावर कार्यवाही करण्यात येईल असे मा.विभागीय आयुक्त, पुणे यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर जिल्ह्यातील मुख्यमंत्री पेयजल योजनांच्या कामांबाबत

(३४) १२८२८० (२९-१२-२०१८) श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील अकोले - २, कर्जत -७, कोपरगाव-२, जामखेड-२, नगर-३, नेवासा-३, पाथर्डी-१, राहता-२, संगमनेर-१ या गावांचा मुख्यमंत्री पेयजल योजनेत समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी किती तालुक्यातील सदर योजनांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत व त्यावर किती खर्च करण्यात आला आहे,

(३) तसेच उर्वरित तालुक्यांतील योजनांच्या कामांची सद्य:स्थिती काय आहे व त्या केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बबनराव लोणीकर (११-०२-२०१९) : (१) होय.

(२) व (३) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत अहमदनगर जिल्हयातील रु.५५९०.१० लक्ष इतक्या किंमतीच्या २६ नवीन पाणी पुरवठा योजनांना मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यापैकी २५ योजनांच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले असून १ योजना निविदा प्रक्रियेत आहे.

कार्यादेश देण्यात आलेल्या सर्व योजनांमधून डिसेंबर-२०१९ पर्यंत पाणी पुरवठा सुरु करण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत सदर योजनांच्या अंमलबजावणीवर रु.७१७.२० लक्ष इतका निधी खर्च झालेला आहे.

तसेच मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौ.निमगांव गांगर्डा व १७ गांवे (ता.कर्जत) ही बंद असलेली प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्यास (रु.५०८.७६ लक्ष) मंजूरी देण्यात आली आहे. सदर योजनेवर आतापर्यंत रु.४१.२० लक्ष इतका निधी खर्च झाला आहे.

(४) प्रश्न उद्भत नाही.

राज्यातील उद्योजकांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून आर्थिक लाभासाठी नाहक त्रास दिला जात असल्याबाबत

(३५) १२८४७९ (२९-१२-२०१८) श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्योजकांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून आर्थिक लाभासाठी नाहक त्रास दिला जात असल्याबाबत मा.राज्यमंत्री, पर्यावरण, अध्यक्ष व सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक महामंडळ यांच्याकडे लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प मंजुरीच्या परवानगीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे अधिकारी श्री. कदम यांनी ५ लाख, कल्याण येथील कार्यालयातील उप प्रादेशिक अधिकारी तसेच भिवंडी येथे कार्यरत असलेले श्री.जयवंत हजारे यांनी सदरची नस्ती काढण्यासाठी २.२५ लक्ष रुपयांची मागणी उद्योजकांकडे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक महामंडळातील अनेक अधिकारी ५ वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही एकाच कार्यालयात कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (०४-०२-२०१९) : (१) दि.०१.१०.२०१८ रोजीच्या ई-मेलद्वारे श्री. महेश चौगुले वि.स.स. यांचे निवेदन सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्राप्त झाले आहे.

(२) श्री. महेश चौगुले, वि.स.स. यांनी दि. ३०.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर तक्रार गैरसमजुतीने केली असल्याबाबत व सदरबाबत त्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार नसल्याचे कळविले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळामध्ये अधिका-यांच्या बदल्या शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार केल्या जातात. मात्र अंशत: काही अधिका-यांच्या बदल्या त्यांच्या कामातील अनुभव व संबंधित कार्यालयाची निकड लक्षात घेता अपवादात्मक परिस्थितीमध्ये केल्या गेलेल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्भ्वत नाही.

(५) प्रश्न उद्भ्वत नाही.

नाशिक जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांची कामे प्रलंबित असल्याबाबत

(३६) १२८५१७ (२९-१२-२०१८) श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील ६९, बागलाण तालुक्यातील २०, कळवण तालुक्यातील ५१, दिंडोरी तालुक्यातील ३६, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील २२, पेठ तालुक्यातील १८, सिन्नर तालुक्यातील १६, नांदगांव तालुक्यातील २२, इगतपूरी तालुक्यातील २४, चांदवड तालुक्यातील १५, येवला तालुक्यातील २६, निफाड तालुक्यातील १८, देवळा तालुक्यातील ७, नाशिक तालुक्यातील १९ इत्यादी नळ पाणीपुरवठा योजनांची काम प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजना केंव्हापासून अपूर्ण आहेत व त्याची कारणे काय आहेत,

(३) सदरहू योजनांवर आतापर्यंत किती खर्च करण्यात आलेला आहे व या योजना केंव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१३-०२-२०१९) : (१) होय,
(२) भारत निर्माण कार्यक्रम तसेच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत मागच्या १३ वर्षात हाती घेतलेल्या योजनापैकी ह्या योजना प्रलंबित आहेत. एकूण १५२ योजना आर्थिक दृष्टया व २६० योजनामधून पाणी पुरवठा सुरु असून आर्थिक व भौतिक दृष्टया पूर्ण करावयाच्या आहेत.

योजना १) लोकवर्गणी, २) हागणदारी मुक्तीची अट, ३) योजनेचा उदभव अयशस्वी होणे, ४) ठेकेदारांकडून विलंब, ५) योजना सुधारित होणे, ६) इतर विभागाच्या परवानग्या मिळणेस विलंब, ७) विद्युत जोडणीस झालेला विलंब, ८) ग्राम पाणी पुरवठा समितीमधील वाद, ९) लेखा परिक्षणास विलंब, १०) अपहार व न्यायालयीन प्रकरणांमुळे विलंब झालेला आहे.
(३) रखडलेल्या ४१२ योजनांवर आतापर्यंत रु. १०९.६२ कोटी इतका खर्च झाला आहे. सदर योजना पुर्ण करणेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्तरावर योजनानिहाय प्रत्यक्ष सुनावणी घेण्यात आली असून योजना अंतिमीकरणाची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

तासगांव (जि. सांगली) तालुक्यात रेशनकार्डधारकांना धान्य मिळत नसल्याबाबत

(३७) १२८६३९ (२९-१२-२०१८) श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगांव (जि. सांगली) तालुक्यात कार्डधारकांना धान्य मिळत नसल्याची तक्रार दिनांक २५ ऑगस्ट, २०१८ रोजी तहसिल कार्यालय, तासगांव येथे झालेल्या आढावा बैठकीत करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कार्डधारकांना नियमित व पुरसे धान्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश बापट (२८-०१-२०१९) : (१) होय.

(२) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना, २०१३ अंतर्गत ग्रामीण भागासाठी रु. ४४,०००/- व शहरी भागासाठी रु.५९,०००/- या वार्षिक कौटुंबिक उत्पन्नाच्या कमाल मर्यादेनुसार पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ता.तासगांव, जि.सांगली येथील उत्पन्नाच्या कमाल मर्यादत पात्र ठरलेल्या सर्व लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ नियमितपणे देण्यात येत आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये जास्तीत जास्त योग्य व गरजु लाभार्थ्यांचा समावेश व्हावा या दृष्टीने दिनांक २१.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये नवीन लाभार्थ्यांची निवड करताना दिनांक ३० एप्रिल, २०१८ पर्यंतच्या शिधापत्रिकांचा समावेश होणार आहे. तसेच, शासन निर्णय दिनांक १६.११.२०१८ अन्वये राज्यातील सर्व जिल्ह्यांना देण्यात आलेल्या सुधारित इष्टांकानुसार सांगली जिल्ह्यासाठी प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांसाठी २१,७६३ लाभार्थ्यांचा वाढीव इष्टांक देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील स्वस्त धान्य योजना बंद केल्याबाबत

(३८) १२८७०६ (२९-१२-२०१८) श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिधावाटप रेशन दुकानांवर अन्न सुरक्षा कायद्यानुसार गरीब कुंटूबियांसाठी असलेली स्वस्त धान्य योजना बंद करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १३ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना बंद करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच योजना पूर्ववत सुरु ठेवण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश बापट (२८-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्हयात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत प्राप्त निधीचा झालेला अपहार

(३९) १२९७०६ (२९-१२-२०१८) ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयात क्लीन मेळघाट व ग्रीन मेळघाट या स्वच्छ भारत मिशन योजनेंतर्गत राबविण्यात आलेल्या अभियनासाठी मंजूर रुपये २७ कोटीं निधीपैकी स्वच्छ भारत कोष अंतर्गत वितरीत करण्यात आलेला रूपये २४०.९५ लक्ष इतका निधी शिल्लक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयातील एकूण ७६२३ नादुरूस्त शौचालयांपैकी १२३४ इतकी शौचालये दुरुस्ती करुन वापरात आणलेली असून अनेक शौचालये केवळ कागदोपत्री दाखविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी झालेल्या गैरव्यवहारासंदर्भात शासनाने गठीत केलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१३-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

अमरावती जिल्हयात नादुरुस्त शौचालय दुरुस्तीचे एकूण ४६०८ इतके उद्दिष्ट होते. त्यापैकी ४२५६ इतके शौचालये दुरुस्त करण्यात आलेली आहे. दुरुस्त करण्यात आलेल्या शौचालयाचे विहित नमुन्यातील माहिती तसेच फोटोंसह ग्रामपंचायतीकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे. उर्वरीत ३५२ नादुरुस्त शौचालये दुरुस्त करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

खोलापूर (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील नवीन पाण्याची टाकी बांधण्याबाबत

(४०) १२९७१८ (२९-१२-२०१८) ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोलापूर (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील लोकसंख्येत झालेली वाढ तसेच जुनी पाण्याची टाकी जिर्ण झालेलीअसल्यामुळे नवीन पाण्याची टाकी बांधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी अमरावती यांना वारंवार लेखी निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बबनराव लोणीकर (१६-०२-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) पिण्याच्या पाण्याची उंच टाकी बांधण्याकरिता गौण खनिजांतर्गत निधी उपलब्ध न झाल्यामुळे उंच पिण्याच्या टाकीचा प्रस्ताव राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०१८-१९ च्या कृती आराखडयामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे शहरातील नागरिकांना स्वस्त धान्य उपलब्ध करुन देण्याबाबत

(४१) १३०४३३ (२९-१२-२०१८) श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यात सन २०१४-२०१५ दरम्यान शेकडो लोकांना नव्याने रेशनकार्ड बनवून देण्यात आले परंतू त्याप्रमाणात शिधावाटप दुकानदारांना देण्यात येणारा धान्याचा कोटा वाढविण्यात न आल्याने शिधापत्रिका असूनही सदर जिल्ह्यातील अनेक नागरिकांना स्वस्त धान्य मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील शिधावाटप दुकानदारांना स्वस्त धान्य उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश बापट (२८-०१-२०१९) :

(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यात दुकानदार वजनमापात ग्राहकांची फसवणूक करीत असल्याबाबत

(४२) १३११९३ (२९-१२-२०१८). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात बहुतांश दुकानदार अनेक दुकांनामध्ये एकाच वस्तूंची वेगवेगळी किंमत आकारुन तसेच दुकानदार, भाजीपाला आणि फळ विक्रेते वजनाऐवजी दगड व नाणे वस्तू मोजण्यासाठी उपयोगात आणून ग्राहकांची फसवणूक करीत असल्याचे दिनांक १ सप्टेबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुकानदारांकडील वजनमापांची दरवर्षी वजन मापे विभागामार्फत पडताळणी करून पासिंग करण्याचा नियम असतांनाही या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याने दुकानदार वर्षानुवर्षे एकच वजन वापरतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वजनमापात ग्राहकांची फसवणूक करणा-या दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश बापट (१५-०२-२०१९) : (१) वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९ नुसार आवेष्टित वस्तू एम.आर.पी. पेक्षा जास्त दराने विकण्यास प्रतिबंध आहे. तथापि एम.आर.पी.च्या मर्यादेत एकाच वस्तूसाठी वेगवेगळे दुकानदार वेगवेगळी किंमत आकारु शकतात. चंद्रपूर जिल्ह्यात एप्रिल २०१८ ते ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत छापील किंमतीपेक्षा जास्त दराने आवेष्टित वस्तूंची विक्री केल्याबद्दल एकूण ५ आस्थापनांवर खटले नोंदविण्यात आले आहेत.

चंद्रपूर जिल्हयातील दुकानदार, भाजीपाला आणि फळविक्रेते वस्तू मोजण्यासाठी वजनाऐवजी दगड व नाणे वापरत असल्याचे आढळून आलेले नाही.

(२) व (३) वैधमापन शास्त्र यंत्रणेकडून वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९ व त्याअंतर्गत विविध नियमांची अंमलबजावणी नियमितपणे केली जाते. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये माहे एप्रिल, २०१८ ते ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत वजने व मापे नियमांचे उल्लंघन करणा-या एकूण १३२ विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण विभागात सहसचिव (तांत्रिक) या पदावर नियमबाहयरित्या नियुक्ती करण्यात आल्याबाबत

(४३) १३१३७० (२९-१२-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण विभागात सहसचिव (तांत्रिक) या पदावर श्री.पि.के.मिरासे यांचे सेवा जेष्ठता यादीमध्ये नाव नसंताना सुध्दा नियमबाहयरित्या पदोन्नती देण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याविरुध्द महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण विभागातील कर्मचाऱ्यांनी वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार नियमबाहय नियुक्ती प्रकरणी संबधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम (२१-०२-२०१९) : (१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये सहसचिव (तांत्रिक) हे पद अस्तित्वात नाही.

श्री. पुं.कि.मिराशे यांना सहायक सचिव (तांत्रिक) या पदावर सेवा ज्येष्ठता यादीतील ज्येष्ठता व गुणवत्तेनुसार पदोन्नती देण्यात आलेली आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील कर्मचारी वर्गाने याबाबत कोणतीही तक्रार केलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि कोल्हापूर चित्रपट नगरीकरिता पूर्ण वेळ अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत

(४४) १३१९२७ (२९-१२-२०१८) श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि कोल्हापूर चित्रपट नगरीकरिता पूर्ण वेळ अधिकारी नसल्याने उपक्रमाची अंमलबजावणी करताना अतिरिक्त कार्यभार सांभाळणा-या अधिका-यांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि कोल्हापूर चित्रपट नगरीकरिता पूर्ण वेळ अधिकारी उपलब्ध न होण्यची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि कोल्हापूर चित्रपट नगरीकरिता पूर्ण वेळ अधिकारी नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (०५-०२-२०१९) : (१) सांस्कृतिक कार्य संचालनालयाकरिता पूर्ण वेळ संचालक दर्जाचे अधिकारी कार्यरत आहेत.

कोल्हापूर चित्रनगरीचा कारभार ऑगस्ट, २००७ मध्ये पूर्णपणे बंद करण्यात आला. मात्र मराठी चित्रपट सृष्टीचा व स्थानिक जनतेचा विरोध लक्षात घेऊन हे महामंडळ बंद न करता कोल्हापूर चित्रनगरीचे पुनरुज्जीवन करण्याबाबत शासनाने मार्च, २००८ मध्ये निर्णय घेतला. त्यानुसार चित्रनगरीचे पुनर्विकासाचे तसेच अंतर्गत पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम टप्प्याटप्प्याने व्यवस्थित सुरु आहे. सबब, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळावर व्यवस्थापकीय संचालकाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आल्याने कोणतीही गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) प्रश्न उदभवत नाही

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

कोरपना (जि.चंद्रपूर) येथील पाणी पुरवठा योजनांसाठीचा निधी नियमबाह्यरित्या खर्च केल्याबाबत

(४५) १३२६८९ (२९-१२-२०१८) ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना येथे सन २०१२-१३ मध्ये मंजुर ग्रामिण पाणी पुरवठा योजना कामासाठी रुपये १ कोटी पेक्षा अधिक निधी खर्च होऊनही सदर पाणीपुरवठा योजना अद्यापही कार्यान्वीत न झाल्याने गावात पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेवर किती निधी खर्च करण्यात आला सदर कामाचे मुल्यमापण व अंदाजपत्रकानुसार कामे झाली आहेत काय, खर्च निधीचा अंकेशन झालेल्या योजनेतील कामे समिती निहाय करण्यात आली आहेत काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोरपना नगर पंचायतीने नियमबाह्यरित्या निधी खर्च करुन सार्वजनिक मालमत्तेची हानी करुन ७ सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या विहिरी बुजविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नगर पंचायत कोरपनाने नियम डावलुन नियमबाह्य पद्धतीने निधी खर्च केल्याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१६-०२-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) मौजा कोरपना, ता.कोरपना येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु.३२८.५८ लाख इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास या विभागाच्या दि.०४.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेचे काम ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांच्यामार्फत करण्यात आले असून या कामाकरिता प्रथम हप्ता रु.११७.१७ लाख समितीस वितरीत करण्यात आला आहे. सदर रकमेपैकी झालेल्या कामावर रु.८९.६१ लाख इतका निधी खर्च झालेला आहे.

(३) हे खरे नाही. नगर पंचायत हद्दीतील प्रभाग क्र.१२ येथील एक जुनी व पुर्णपणे कोरडी असलेली व संरक्षण कठडे नसलेली विहीर जिवित हानी होण्याची शक्यता असल्याने नगर पंचायत विशेष सभा ठराव क्र.१, दि.१८.०१.२०१७ अन्वये कार्यवाही करुन बुजविलेली आहे. उर्वरित सहा विहिरी कोरडया असल्याने व संरक्षण कठडे नसल्याने जिवित हानी होवू नये म्हणून तत्कालिन कोरपना ग्रामपंचायत यांच्यामार्फत बुजविण्यात आल्या आहेत.

(४) कोरपना येथील नळ पाणीपुरवठा योजनेचे काम ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, यांच्या मार्फत प्रगतीत असताना दि.१७.०६.२०१५ च्या नगरविकास विभागाच्या अधिसुचनेनुसार ग्रामपंचायतीच्या अंतर्गत सर्व समित्यांचे अधिकार संपुष्टात आल्याने व नागरी निकषानुसार ७० LPCD ने पाणीपुरवठा करणे आवश्यक असल्याने योजनेचे पुढील कामकाज थांबलेले आहे.याबाबत नगर पंचायत कोरपना मार्फत नळ पाणीपुरवठा योजनेच्या मागणीचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास सादर करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने सुधारित कोरपना नळ पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, चंद्रपूर यांच्याकडून करण्यात येत आहे. तसेच तत्कालिन ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, कोरपना यांना दिलेल्या रु.११७.१७ लाख रकमेच्या केलेल्या कामांचे अंतिम मुल्यांकन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार समितीकडे असलेला अधिकचा निधी परत घेण्यात येईल. समितीमार्फत पूर्ण करण्यात आलेली उपांगे सुधारित कोरपना नळ पाणी पुरवठा योजनेमध्ये वापरण्यात येणार आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील नाट्यगृहांच्या दुरवस्थेबाबत

(४६) १३३६५४ (२९-१२-२०१८) श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नाट्यगृहांच्या दुरवस्थेचे सर्वेक्षण करुन सन २०१५-१६ मध्ये सांस्कृतीक कार्य संचालनालयाने पाहणी अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने आपल्या अहवालात कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१९) : (१) होय.

(२) नाट्यगृह सर्वेक्षण अहवालात खालील प्रमाणे शिफारशी सादर केल्या.

• बांधकाम अवस्थेत असलेली नाट्यगृह तातडीने पूर्ण करणे.

• दुरुस्ती आवश्यक असलेल्या नाट्यगृहांची तातडीने दुरुस्ती करणे.

• नवीन नाट्यगृह बांधावयाचे झाल्यास, नाट्यगृहांची देखभाल आणि कार्यचलन याकरीता मार्गदर्शन तत्वे शासनाने आखून दयावीत.

• स्थानिक स्वराज्य संस्थांनी या मार्गदर्शक तत्वांना बांधील असल्याबाबत संमती पत्र दिल्यानंतर शासनाने आर्थिक सहाय्य दयावे.

• मार्गदर्शन तत्वांचे पालन करण्याबाबत शासन नियुक्त समितीने नियमित तपासणी करावी.

सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. तथापि, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नवीन नाट्यगृह बांधकामास अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मांगवाडी (ता.रिसोड, जि.वाशिम) येथे बोअरवेलचे दूषित पाणी पिऊन मजूराचा झालेला मृत्यु

(४७) १३४३६६ (२९-१२-२०१८) श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांगवाडी (ता.रिसोड, जि.वाशिम) येथे बोअरवेलचे दूषित पाणी प्यायल्याने एका मजूराचा मूत्यू झाला असून सहा मजूरांवर रुग्णालयात उपचार सुरु असल्याचे दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मृत मजूराच्या कुटूंबियांना खास बाब म्हणून आर्थिक मदत देण्यासोबतच तालुक्यातील जलस्त्रोत्रांचे नमुने घेऊन व चाचणी करुन खबरदारीच्या उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२१-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) मांगवाडी (ता.रिसोड,जि.वाशिम) येथे बोअरवेलचे दूषित पाणी प्यायल्याने एका मजूराचा मृत्यू झाला नसून कंत्राटदाराने उपलब्ध करून दिलेल्या पिण्याच्या पाण्याच्या कॅन मधील पाणी पिल्याने मृत्यू झाला आहे. सदर गावामधील वापरातील चार हातपंप असून सदर स्त्रोतांचे पाणी दूषित नाही तसेच साथरोग लागण झालेल्या चार मजूरांवर दि.२२.१०.२०१८ रोजी ग्रामीण

रूग्णालय रिसोड येथे उपचार सुरू असल्याचे निर्दशनास आले आहे. ग्रामीण भागातील जनतेला दररोज शुध्द पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची असून दररोज व नियमित पाणी शुध्दीकरण करणेकरिता जल सुरक्षकाची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या मार्फत पाणी शुध्दीकरण करणे, पाणी नमुने, ब्लिचींग पावडर नमुने घेणे तसेच पाणी पुरवठा करणा-या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे पाणी नमुने जैविक तपासणीकरिता जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा येथे तपासणीसाठी पाठविणे इत्यादी कामे करून घेतली जातात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्हयातील भूजल पातळी सर्वेक्षणाबाबत

(४८) १३४७४६ (१०-१२-२०१८) श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात वरिष्ठ भूजल वैज्ञानिक कार्यालयाद्वारे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये भूजल पातळी तपासण्याकरिता ८१ विहिरींचे निरक्षण नोंदण्यात आले असून त्यात जिल्हयातील भूजल पातळी सरासरी १.४५ मीटरने खालावण्याची शक्यता असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील मागील दहावर्षातील भूजल पातळीची घसरण/वाढ यांची आकडेवारी काय आहे तसेच घटते पर्जन्य, वाढता पाणी उपसा लक्षात घेता भूजल पातळीत वाढ करण्यासाठी शासनामार्फत कोणते धोरण आखण्यात आले आहे,

(३) असल्यास, सदर धोरणांचे स्वरूप काय तसेच त्याची फलनिष्पती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बबनराव लोणीकर (०४-०२-२०१९) : (१) होय.

अकोला जिल्हयात वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत ८१ निरीक्षण विहिरी निश्चित करण्यात आल्या असून, माहे सप्टेंबर, २०१८ अखेरीस अकोला जिल्हयातील भूजल पातळीची मागील ५ वर्षांतील भूजल पातळीशी तुलना केली असता, अकोला जिल्हयाच्या सरासरी भूजल पातळीमध्ये १.४६ मीटरने घट झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) अकोला जिल्हयातील मागील १० वर्षांतील भूजल पातळीची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे :-
अ. क्र. वर्ष मागील ५ वर्षांची माहे, सप्टेंबर मधील सरासरी भूजल पातळी (मी. मध्ये) माहे, सप्टेंबर मधील भूजल पातळी (मी. मध्ये) वाढ अथवा घट (मी. मध्ये)

१ २००८ ८.८२ ८.३८ ०.४४
२ २००९ ८.९३ ९.७४ - ०.७८
३ २०१० ८.७८ ८.०३ ०.७५
४ २०११ ८.०९ ८.२२ - ०.१३
५ २०१२ ८.५८ ८.७३ - ०.१५
६ २०१३ ९.२९ ७.५३ १.७६
७ २०१४ ८.८२ १०.२९ - १.४७
८ २०१५ ८.९० ९.३९ - ०.४९
९ २०१६ ८.६८ ८.६० ०.०८
१० २०१७ ८.४२ १०.८४ - २.४२
११ २०१८ ८.८२ १०.२८ - १.४६

भूजल पातळीत वाढ करण्यासाठी धोरण

१. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत स्त्रोत बळकटीकरणाच्या योजना हाती घेण्यात येत आहेत.

२. राज्यभरात जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र राज्यात दिनांक ०१/०६/२०१४ पासून महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ लागू करण्यात आलेला आहे.

(३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातील शाश्वतता या घटकांतर्गत अकोला जिल्ह्यात सन २०१०-११ ते २०१८-१९ या कालावधीत २१९ टंचाईग्रस्त गावे/ वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोत बळकटीकरणाच्या ८८३ उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

• जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ ते २०१८-१९ या कालावधीत ५३ गावे/ वाड्यांमध्ये ४९९ स्त्रोत बळकटीकरणाच्या उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

• उपरोक्त कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमुळे जिल्ह्यातील सतत टंचाईग्रस्त भासणाऱ्या २७२ गावांमध्ये टंचाई प्राबल्य कमी होऊन टँकरने पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता भासली नाही.

• महाराष्ट्र भूजल विकास व व्यवस्थापन अधिनियम २००९ राज्यामध्ये ०१ जून, २०१४ पासून लागू करण्यात आला आहे. या अधिनियमांतर्गत राज्यातील अतिशोषित व शोषित पाणलोट क्षेत्रातील गावांमध्ये ६० मी. पेक्षा जास्त खोलीची विंधन विहीर घेण्यास राज्य भूजल प्राधिकरणाने बंधन घातले आहे.

(४) लागू नाही.

अमरावती शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहीनी जीर्ण झाल्याबाबत

(४९) १३४७५७ (३०-०१-२०१९) डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहराला पाणीपुरवठा करणारी नेरपिंगळाई ते तपोवन ही जलवाहीनी जिर्ण झाल्यामुळे नवीन जलवाहीनीच्या अंदाजपत्रकास १५ दिवसांमध्ये तांत्रिक मान्यता देवून नगरविकास विभागाकडे देणार असल्याबाबत मा.पाणीपुरवठा मंत्री यांनी दिनांक २० जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास आश्वासित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य जलवाहीनीच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यात देण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बबनराव लोणीकर (०६-०२-२०१९) : (१) होय. हे खरे आहे.

(२) नाही.

(३) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांचेकडून दि.२८.६.१८ रोजी तांत्रिक मान्यतेचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व सनियंत्रण कक्ष, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई कार्यालयात सादर करण्यात आला असता, काही तांत्रिक मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, अमरावती कार्यालयामार्फत सदर मुद्यांची पुर्तता करुन प्रस्ताव पुनश्च: दि.३.११.१८ रोजी मंजुरीसाठी अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व सनियंत्रण कक्ष, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई यांचेकडे फेरसादर करण्यात आलेला आहे.

मौजे कुंभारी (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील स्वस्त धान्य दुकानास धान्य पुरवठा करण्याबाबत

(५०) १३४७७५ (१०-१२-२०१८) श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुंभारी (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील स्वस्त धान्य दुकानदाराने सन २०१८ मध्ये मागणी करुन व कोणताही गैरव्यवहार वा अनियमितता केली नसतानाही पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, रेणापूर यांनी त्यास धान्य वितरीत न करता शेजारील गावातील दुकानदारास कुंभारी गावाचे धान्य नियमबाह्यरित्या वितरीत करून वाटप केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकाराचा दुरुपयोग करुन नियमबाह्यरित्या धान्य वाटप केलेल्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतीनिधींनी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे सन २०१८ मध्ये निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (२५-०१-२०१९) : (१) मौजे कुंभारी, ता. रेणापूर येथील स्वस्त धान्य दुकानदाराकडे एकुण १५२ कार्डधारक लाभार्थी आहेत. यापैकी ११० कार्डधारकांनी दुकानदाराच्या आरेरावी व उद्दटपणामुळे धान्य घेण्यास तयार नव्हते. या लाभार्थ्यांच्या मागणी नुसार त्यांना मौ. ईटी गावातील दुकानदारामार्फत धान्य वाटप करण्यात आले आहे.
(२) होय,

स्थानीक लोकप्रतिनिधीचे दि.१४.०८.२०१८ चे पत्र प्राप्त.

(३) तहसिलदार, रेणापूर यांनी लाभार्थ्यांच्या मागणीनुसार धान्य वाटप केले आहे. हे धान्य दक्षता समिती, पंचासमक्ष ऑफलाईन पध्दतीने वाटप केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.